**MHAH**230002512015

## नियमित दिवाणी दावा क्र. १०४/२०१५ मधील नि.७७ वरील आदेश
## (दत्तात्रय बुवाजी कोळपे वि. पोपट नारायण शेलार वगैरे)

१. अर्ज व म्हणणे पाहिले. उभय पक्षांचे सुविदय वकीलांचा युक्तीवाद ऐकला.

२. वादी यांनी अर्जात कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा कब्जा मिळणेसाठी, मोजणी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. दरम्यान प्रतिवादी क्र. ८ मारुती नारायण शेलार हे दि. १२/०८/२०२२ रोजी मयत झाले असून त्याचे वारस रेकॉर्डवर घेणे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक व गरजेचे आहे. अर्जात नमुद केल्याप्रामाणे मयत प्रतिवादी क्र.८ मारुती नारायण शेलार यांची कायदेशीर वारस पैकी दोन मुले दाव्यातील प्रतिवादी क्र.९ शिवाजी मारुती शेलार व प्रतिवादी क्र.१० दिलीप मारुती शेलार हे प्रतिवादी म्हणुन यापुर्वीच दाव्यात समाविष्ट आहेत. अर्जात नमुद केल्याप्रमाणे मयताची पत्नी हौसाबाई मारुती शेलार व विवाहित मुलगी हिराबाई हौसराव भागवत हे प्रतिवादी क्र. ८ चे इतर कायदेशिर वारस असून प्रतिवादी नं.८ चे नावापुढे मयत दर्शवून सदर वारस रेकॉर्डवर घेण्याचा आदेश होवुन तशी निशाणी १ ला व दावा रजिस्टरला दुरुस्ती करण्याची परवानगी वादीने मागितली आहे.

३. प्रतिवादी यांनी त्याच अर्जावर म्हणणे देवुन अर्जास हरकत घेतली आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन करता, प्रतिवादी क्र. ८ मारुती नारायण शेलार हे दिनांक १२/०८/२०२२ रोजी बेलवंडी बु., ता.श्रीगोंदा, जि. अहमदनगर येथे मयत झाले

आहे. वादी यांनी प्रतिवादी क्र. ८ मयत झाल्याबाबत दि.०७/०८/२०२४ रोजी त्याचे मृत्यु प्रमाणपत्र प्रस्तुतच्या अर्जासोबत जवळपास तेवीस महिन्यांच्या विलंबाने दाखल केलेले आहे. तसेच प्रतिवादी याचे वकीलांनी दिलेले म्हणणे पाहता, प्रतिवादी क्र. ८ हे मयत झाल्याबाबत अभिलेखावर वाद नाही. प्रस्तुतचा दावा हा कब्जा मिळणेसाठी, मोजणी व निरंतर ताकीद मिळणेसाठी दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादी क्र. ८ चे वारस अर्जात आवश्यक पक्षकार आहेत. सर्व आवश्यक पक्षकारांचे दरम्यान वादप्रश्नाचे निरसन एकाचवेळी होणे आवश्यक असल्याने प्रतिवादीचे प्रस्तावित वारस अभिलेखावर आणणे गरजेचे आहे. करीता, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

**आ दे श**

१. अर्ज नि.७७ मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी मयत प्रतिवादी क्र. ८ यांचे प्रस्तावित वारस दाव्यात समाविष्ट करुन त्याबाबतची आवश्यक दुरुस्ती पुढील तारखेपर्यत मुळ दाव्यात करावी व तशी दुरुस्त प्रत दाखल करावी.

SHIVAJI PANDHRINATH KEKAN

Digitally signed by SHIVAJI PANDHRINATH KEKAN
Date: 2024.12.13 10:52:58 +0530

श्रीगोंदा.
दिनांक १२/१२/२०२४.

दिवाणी न्यायाधीश, व. स्तर,
श्रीगोंदा, जि. अहमदनगर.